**ठळक बातम्या**

- वाढत्या भू-राजकीय तणावाच्या आव्हानांना सामोरं जाण्यासाठी एकजुटीनं काम करावं असं प्रधानमंत्र्यांचं ब्रिक्स देशांना आवाहन

- पश्चिम बंगालमधे समुद्रकिनाऱ्यालगत क्षेपणास्त्र चाचणी तळ उभारण्याच्या प्रस्तावाला तिथल्या राज्यसरकारची मंजुरी

- जो देश आठवणी, इतिहास, आणि परंपरेचं रक्षण करू शकत नाही, तो कितीही शक्तिशाली असला तरी संपुष्टात यायला वेळ लागत नाही, असं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन

**आणि**

- एलेना रिबाकिना ने अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेच्या विजेतेपदासह मिळवलं जागतिक मानांकनात अव्वल स्थान

**<><><><><>**

वाढत्या भू-राजकीय तणावाचा जगभरातल्या सामान्य नागरिकांच्या जीवनावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे या आव्हानांना सामोरं जाण्यासाठी आणि विशेषतः ग्लोबल साऊथ मधे सर्वसमावेशक विकासाला चालना देण्यासाठी ब्रिक्स देशांनी एकजुटीनं काम करणं आवश्यक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ब्रिक्स शिखर परिषदेत केलेल्या भाषणात ते बोलत होते. ‘तंत्रज्ञान तसंच महत्त्वपूर्ण खनिजांचं शस्त्रीकरण’ याबाबतही गंभीर चिंता व्यक्त करतानाच सामायिक प्रगती आणि समृद्धीच्या मार्गात यामुळे अडथळे निर्माण होऊ शकतात, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी सध्या युद्धांमध्ये गुंतलेल्या रशिया, इराण यासह चीनसारख्या राष्ट्रांचे राष्ट्रप्रमुख या शिखरपरिषदेत हजर होते.

भारताच्या अध्यक्षतेखाली लवचिकता, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वतता या चार मुद्यांवर ब्रिक्सने लक्ष केंद्रित केलं आहे. आपल्या सहकार्य आणि पाठिंब्यामुळे आपल्या सामायिक दृष्टिकोनाचं 'सर्वांच्या हिताचं' रूपांतर करण्यात यशस्वी झालो आहोत, याचा आनंद असल्याचं मोदी यांनी सांगितलं.

***होल्ड… बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

दरम्यान, चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग हे पुन्हा मायदेशी रवाना झाले आहेत.

**<><><><><>**

यशस्वीरीत्या पार पडलेली ब्रिक्स इंडिया २०२६ ची शिखर परिषद आणि या परिषदेनं स्वीकारलेली नवी दिल्ली घोषणा ही भारतासाठी तसंच जागतिक व्यवस्थेसाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरल्याचं भारताचे माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतानं पुन्हा एकदा आपल्या मुत्सद्देगिरीची ताकद दाखवून दिल्याचं त्यांनी म्हटलं आहे. स्वतःच्या सांस्कृतिक मूल्यांवर विश्वास ठेवणारा भारत जगासोबत संवाद, भागीदारी आणि सहकार्यासाठी सदैव खुला आहे, असंही ते म्हणाले. नेतृत्व म्हणजे केवळ प्रभाव निर्माण करणं नव्हे, तर विकास, शांतता, लवचिकता, नवोन्मेष आणि शाश्वत विकास या समान प्राधान्यक्रमांकरता विविध देशांना एकत्र आणणं, हे भारतानं ब्रिक्स देशांच्या शिखर परिषदेत दाखवून दिल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

नवी दिल्लीत सुरू असलेल्या ब्रिक्स परिषदेत काल सर्व सदस्य देशांनी नवी दिल्ली जाहीरनामा स्वीकारल्याबद्दल जागतिक आरोग्य संघटनेनं सदस्य देशांची प्रशंसा केली आहे. ही स्वीकृती म्हणजे व्यापक आरोग्य कवच, सक्षम आणि लवचिक आरोग्य व्यवस्था आणि पँडेमिक ॲग्रीमेंटमधल्या 'पॅथोजन ॲक्सेस अँड बेनिफिट शेअरिंग'बद्दलच्या वाटाघाटी यशस्वीरीत्या पूर्ण करण्याप्रति सदस्य

देशांच्या वचनबद्धतेचं प्रतीक आहे, असं संघटनेचे महासंचालक टेड्रोस घेब्रेयसस यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी इराणचे वाणिज्य व्यवहार आणि अर्थमंत्री सय्यद अली मादानीझादेह यांची आज नवीदिल्लीत भेट घेतली. ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी झाल्याबद्दल तसंच अर्थविषयक चर्चांमध्ये रचनात्मक सहभाग घेतल्याबद्दल सीतारामन यांनी त्यांचे आभार मानले. या बैठकीदरम्यान दोन्ही बाजूंनी आर्थिक विकासाशी संबंधित मुद्द्यांवर तसंच परस्पर हिताच्या क्षेत्रांमध्ये सहकार्याच्या संभाव्यतेवर विचारांची देवाणघेवाण केल्याची माहिती, अर्थमंत्रालयाने दिली.

<><><><>

पश्चिम बंगालच्या पूर्व मेदिनीपूर जिल्ह्यात समुद्रकिनाऱ्यालगत क्षेपणास्त्र चाचणी तळ उभारण्याच्या प्रस्तावाला तिथल्या राज्यसरकारने मान्यता दिली आहे. जुनपुट गावात उभारण्यात येणारा हा तळ चंडीपूरच्या क्षेपणास्त्र चाचणी तळापासून ७० किलोमीटर अंतरावर आहे. आणखी एक तळ आंध्रप्रदेशात उभारण्यात येणार असल्याची माहिती पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी दिली आहे.

<><><><>

जागतिक स्तरावर वाढती अनिश्चितता, कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये झालेली वाढ, अमेरिकी रोख्यांच्या परताव्यातली वाढ अशा अनेक कारणांमुळे परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातून सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात १३ हजार १३८ कोटी रुपयांची गुंतवणूक काढून घेतली आहे. यामुळे २०२६ या वर्षात एकूण काढून घेतलेल्या गुंतवणुकीची रक्कम २ लाख ३७ हजार कोटी इतकी झाली असून २०२५ या संपूर्ण वर्षात काढून घेतलेल्या एकूण रकमेच्या

म्हणजेच १ लाख ६६ हजार कोटी रुपयांच्या रकमेच्या तुलनेत यावर्षीची आतापर्यंतची काढून घेतलेली ही रक्कम बरीच मोठी आहे.

**<><><><><>**

जो देश आठवणी, इतिहास, संस्कार, भाषा, पुरातन दस्तऐवज आणि परंपरेचं रक्षण करू शकत नाही, तो कितीही शक्तिशाली असला तरी संपुष्टात यायला वेळ लागत नाही, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. मुंबईतल्या ऐतिहासिक एशियाटिक सोसायटीत आयोजित कार्यक्रमात थोड्या वेळापूर्वी ते बोलत होते.

ज्ञान हे कायमच मुक्त असायला हवं, त्यादृष्टीनं एशियाटिक सोसायटीमध्ये असलेल्या ज्ञानाच्या वारशाचा उपयोग महान भारताच्या उभारणीसाठी होईल, या दिशेनं आपण वाटचाल करायला हवी, असं ते म्हणाले.

भविष्याचा वेध घेण्यासाठी इतिहास माहीत असणं अत्यंत गरजेचं असतं. एशियाटिक सोसायटीच्या रूपानं अशा प्राचीन इतिहासाचं जतन आणि संवर्धन होत आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. ग्रंथालय विभागाचं मुख्य कार्यालय लवकरच नव्या जागेत हलवले जाईल आणि एशियाटिक सोसायटीला त्यांच्या कामात शक्य ती सर्व मदत केली जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं.

भावी पिढ्यांना आपला समृद्ध इतिहास समजला पाहिजे, यासाठी एशियाटिक सोसायटीमधील प्राचीन वारशाचं जतन आणि संवर्धन करणं हे आपलं कर्तव्य आहे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. याच अनुषंगानं एशियाटिक सोसायटीला राज्य सरकारकडून काहीही कमी पडू दिलं जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

<><><><><>

गणेशेत्सवाची तयारी सर्वत्र उत्साहानं सुरु आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी सार्वजनिक उत्सवांच्या मोठमोठ्या मूर्ती आधीच मंडपात विराजमान झाल्या आहेत. बाजारपेठांमधे फुलं, सजावटीचं सामान, पूजासाहित्य इत्यादी खरेदी करण्यासाठी गर्दी झाली आहे. विविध दुकानं, ऑनलाईन विक्री सेवा इत्यादींमधे गणेशोत्सवानिमित्त विशेष सवलती उपलब्ध आहेत. गौरी गणपती सणाकरता गावी जाण्यासाठी भाविकांची गर्दी आहे. रस्त्यांवर अनेक ठिकाणी वाहतुकीची कोंडी झाली आहे, तर रेल्वे आणि एसटी गाड्याही प्रवासी भरभरून जात आहेत.

मुंबईसह अनेक ठिकाणी आज सकाळपासून पावसानं जोरदार हजेरी लावल्यामुळे उत्साहावर काहीसा परिणाम झाल्याचं दिसत आहे.

<><><><><>

एलेना रिबाकिना हीनं अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेच्या महिला एकेरीचं विजेतेपद पटकावलं आहे. विजेतेपदासाठी काल झालेल्या अंतिम सामन्यात रिबाकीना हीनं ॲरिना सबालेंका हीचा ६-४,५-७, ६-२ असा पराभव केला. रिबाकीनाचं हे पहिलं अमेरिकन खुलं विजेतेपद तर तिसरं ग्रँड स्लॅम अजिंक्यपद ठरलं आहे. या विजयासह रिबाकीना, सबालेंकाला मागे टाकून जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावरही पोहचली आहे.

पुरुष दुहेरीत अमेरिकेच्या ख्रिश्चन हॅरिसन आणि ब्रिटनच्या नील स्कुपस्की या जोडीनं विजेतेपदावर नाव कोरलं. त्यांनी जर्मनीच्या केविन क्राविट्झ आणि टिम पुएट्झ यांचा पराभव करून जेतेपद पटकावलं.

पुरुष एकेरीच्या जेतेपदासाठी आज रात्री अलेक्झांडर झ्वेरेव्ह आणि बेन शेल्टन यांच्यात अंतिम लढत होईल. भारतीय वेळेनुसार आज रात्री साडेअकरा वाजता हा सामना सुरू होईल. उपांत्य फेरीच्या लढतीत झ्वेरेव्ह यानं रशियाच्या

कॅरेन याचा पराभव करून, तर शेल्टन यानं अमेरिकेच्याच फ्रांसिस याला पराभूत करून अंतिम फेरीत प्रवेश केला. शेल्टन याच्या कारकिर्दीतला हा पहिली ग्रँडस्लॅम अंतिम सामना असणार आहे.

<><><><><>

महिला टी-२० आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात आज भारताचा सामना गतविजेत्या श्रीलंकेशी होणार आहे. दुबईत होणारा हा सामना भारतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता सुरू होईल.

<><><><><>

नेपाळमधल्या चिलिमे जलविद्युत प्रकल्पात बचावकार्य सुरूच असून, एका बोगद्यात सहा कामगार अडकले असल्याची शक्यता आहे. भारतीय आणि नेपाळी पथकं अवजड यंत्रसामग्रीच्या मदतीनं बोगद्यातला चिखल आणि ढिगारा हटवत असून, भूमिगत वीजगृहाच्या दिशेनं पुढे जायचे प्रयत्न सुरू आहेत.

दरम्यान, नेपाळममधल्या पुरात मरण पावलेल्यांची संख्या १ हजार ३८६ वर पोहोचली असून, अजूनही सुमारे ५ हजार १३० जणांचा थांगपत्ता लागलेला नाही. आतापर्यंत १३ हजार ७०० हून अधिक लोकांची सुटका करण्यात आली आहे, तर ३३९ जणांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

//<><><><><>//